प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# माशाळकर, पांगे यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार

**उमरगा, पुढारी वृत्तसेवा :** लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात (स्वायत्त) कार्यरत असलेल्या उमरगा येथील एक प्राध्यापिका व विद्यार्थ्यांनीचा पुणे येथे नुकताच राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



आजकालच्या वाढत्या सायबर गुन्हेगारी बद्दल समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम लातूरसह धाराशिव, परभणी तसेच सोलापूर जिल्ह्यातील शाळा, कॉलेज व समाजातील अनेक घटकातील लोकांसाठी राबविण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बीएस्सी, सीएस च्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सायबर योद्धा व ज्योती वैजिनाथ माशाळकर यांची समन्वयक म्हणून काम केले. या उपक्रमांतर्गत एकूण १९० शाळा व महाविद्यालये तसेच विविध शासकीय कार्यालये, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा न्यायालये, बँका, साखर कारखाने आदि ठिकाणच्या सत्तर हजारापेक्षा जास्त लोकांना वेगवेगळ्या सायबर फ्राऊड्स कसे घडतात व त्यापासून सावधगिरी कशी बाळगायची याबद्दल माहिती दिली. या उत्कृष्ट कार्यासाठी महाविद्यालयाला क्विक हिल फॉउंडेशनचा स्मार्ट सायबर क्लब रनर अप- १ तसेच बीएस्सीसी तृतीय वर्षातील प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला बेस्ट सेक्रेटरी रनर अप- १ हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र सायबरचे संजय शिंत्रे, क्विक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर उपस्थित होते. प्रा ज्योती माशाळकर ह्या शहर तर प्रतिक्षा पांगे हि कोरेगावची कन्या आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.